असा. क्र. १९ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, फेब्रुवारी १६, २००९/माघ २७, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग चार-अ

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ फेब्रुवारी २००९

आदेश

नोंदणी अधिनियम, १९०८.

क्रमांक नोंदणी. २००८/प्र.क्र. ४०३/म-१.— नोंदणी अधिनियम, १९०८ (१९०८ चा १६), महाराष्ट्र राज्यास लागू करताना, त्याच्या कलम ७८ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक आरजीएन. १५५८/६७७३१/एन, दिनांक १७ जुलै १९६१ यात प्रसिद्ध करण्यात आलेल्या फी संबंधीच्या तक्त्यामध्ये सुधारणा करून ती



[किंमत : रुपये १८.००]

अधिसूचना, उक्त अधिनियमाच्या कलम ७८ नुसार याद्वारे प्रसिद्ध करून फी संबंधीच्या तक्त्यामध्ये दिनांक १७ फेब्रुवारी २००९ पासून पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेच्या फी संबंधीच्या तक्त्यामध्ये अनुच्छेद एक मधील.—

(क) खंड (३अ) मध्ये "मोबदल्यासह" या मजकुरानंतर "किंवा मोबदल्याशिवाय" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) खंड (४), उपखंड (अ) मधील "३०,००० रुपयांच्या कमाल मर्यादेला अधिन राहून" हा मजकूर वगळण्यात येईल.

(ग) टीप क्र. ९ नंतर पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईल :—

"टीप ९ क.— मोबदल्याशिवाय दिलेले कुलमुखत्यारपत्र जर वडील, आई, भाऊ, बहीण, पत्नी, पती, मुलगा, मुलगी, नातू, नात किंवा आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) मधील व्याख्येनुसार जवळच्या नातेवाईकाच्या नावाने दिले असेल तर, त्या कुलमुखत्यारपत्रास केवळ रुपये १०० इतकी नोंदणी फी आकारण्यात येईल.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

द. रा. माळी,
शासनाचे सहसचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the16th Feburary 2009

### Order

REGISTRATION ACT, 1908.

No. RGN. 2008/C.R. 403/M-1.—In exercise of the powers conferred by section 78 of the Registration Act, 1908 (16 of 1908), in its application to the State of Maharashtra the Government of Maharashtra hereby, with effect from the 17th February 2009, amends the Table of Fees published under the Government Notification, Revenue and Forests Department, No. RGN. 1558/67731/N, dated the 17th July 1961, and the same is hereby published as required by section 78 of the said Act, as follows, namely :—

In the said notification, in the Table of Fees, in Article 1,—

(*a*) in clause (*3A*), after the words "Power of Attorney given for consideration" the words "or without consideration" shall be inserted;

(*b*) in clause (*4*), in sub-clause (a), the words and figures "subject to the maximum fee of Rs. 30,000" shall be deleted;

(*c*) after *Note 9*, the following *Note* shall be inserted, namely :—

"*Note 9A*.—In the case of power of Attorney given without consideration to the father, brother, sister, husband, wife, son, daughter, grand-daughter or to near relatives as defined under the Income Tax Act, 1961 (43 of 1961), the amount of registration fee shall be Rs. 100 only.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. R. MALI,
Joint Secretary to Govenment.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई